**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.**

**क प्रभाग समिती सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक- १६**

**स भा वृ तां त**

दिनांक ४/९/२०१८ वेळ-दुपारी १२.०० वाजता

---------------------- ------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. “क” प्रभाग समिती मासिक सभा मंगळवार दि.४/९/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) मा.लोंढे नम्रता योगेश | सभापती |
| २) मा.अश्विनी संतोष जाधव | |
| ३) मा.वसंत प्रभाकर बोराटे | |
| ४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव | |
| ५) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव | |
| ६) मा.राहूल हनुमंतराव भोसले | |
| ७) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर | |
| ८) मा.समीर मोरेश्वर मासुळकर | |
| ९) मा.धावडे गोपीकृष्ण भास्कर | स्विकृत सदस्य |
| १०) मा.सागर सुखदेव हिंगणे | स्विकृत सदस्य |
| ११) मा.श्रीमती वैशाली प्रशांत खाडये | स्विकृत सदस्य |

याशिवाय मा.अण्णा बोदडे- क्षेत्रीय अधिकारी, मा.प्रदिप मुथा – प्रशासन अधिकारी, मा.संजय घुबे- कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.एन.के.देशमुख – कार्यकारी अभियंता विदयुत ,मा.दवंडे- उपअभियंता पापु, मा.माने- उपअभियंता स्था, वाईकर- उपअभियंता ड्रेनेज, श्री.पुसाळकर- उपअभियंता स्थापत्य,मा.बाळु लांडे – उपअभियंता विदयुत मा.बी.बी.कांबळे-सहा.आरोग्याधिकारी, श्री.रमेश भोसले- मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.दवाळे, झिटे, उज्जीनवाला - आरोग्य निरीक्षक, श्रीमती दमयंती पवार- कनिष्ठ अभियंता विदयुत,श्री.केदार कनिष्ठ अभियंता विदयुत हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

उपस्थित सन्मा.सदस्य/सदस्या, अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक- २) नॉन डी.पी.७ मीटर रस्ता करुन मिळणेबाबत- मा.राहूल भोसले,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ३) प्रभाग क्र.६ मधील राम मंदीर रोड चक्रपाणी वसाहत याठिकाणी स्वागत कमान उभारण्याबाबत- मा.राजेंद्र लांडगे,अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ४) प्रभाग क्र.६ मधील चक्रपाणी वसाहत येथे नवीन नामफलक लावण्यास मंजुरी मिळण्याबाबत- मा.राजेंद्र लांडगे,अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव

.

दिनांक ७/८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१५ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक – २१ विषय क्रमांक- १

दिनांक-४/९/२०१८

सुचक-मा. नम्रता लोंढे अनुमोदक- मा. अश्विनी जाधव

संदर्भ- मा.नम्रता लोंढे,मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

मा.सौ.नम्रता योगेश लोंढे यांचा प्रस्ताव- प्रभाग क्रमांक ८ से.नं.४ मध्ये सध्या नवीन उदयानाचे कामकाज चालू आहे व सदरचे कामकाज पूर्णत्वास आलेले असल्याने सदर उदयानास **"कै.पै.भगवान तात्या लोंढे उदयान"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक- २

दिनांक-४/९/२०१८

सुचक-मा. राहूल भोसले अनुमोदक- मा. समीर मासुळकर

संदर्भ- मा.राहूल भोसले,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.९ मधील झिरो बॉईज चौक रिक्षा स्टँण्ड,नानी पार्क,गणेश मंदीर ते A-1सलून याठिकाणी वाढती रहदारी असल्याने नागरीकांना येता-जाता नाहक त्रास सहन करावा लागत आहे.तरी सि.टी.एस.६३९६ प्लॉट नं.१३१ व सि.टी.एस. नं.६३९७ प्लॉट नं.१३० या दोन्ही प्लॉटच्या मधुन पुढे सि.टी.एस. नं.६४०६ प्लॉट नं.१४० व सि .टी.एस. नं.६४०७ प्लॉट नं. १४१ या प्लॉट मधुन जाणारा नॉन डी.पी.५ मीटरचा रस्ता करण्यात यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक- ३

दिनांक-४/९/२०१८

सुचक-मा. राजेंद्र लांडगे अनुमोदक- मा. अश्विनी जाधव

संदर्भ- मा.राजेंद्र लांडगे,मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६ मधील चक्रपाणी वसाहत राममंदीर रोड याठिकाणी नवीन स्वागत कमान उभारण्यात यावी जेणेकरुन परिसराची व रस्त्याची शोभा वाढेल व कमानीस **"ह.भ.प.आनंदराव गुळवे प्रवेशद्वार"** सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक – २४ विषय क्रमांक- ४

दिनांक-४/९/२०१८

सुचक-मा. राजेंद्र लांडगे अनुमोदक- मा. अश्विनी जाधव

संदर्भ- मा.राजेंद्र लांडगे,मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६ मध्ये चक्रपाणी वसाहत येथे नवीन नामफलक खालीलप्रमाणे देण्यात यावे.

१. "कै.गजानन लक्ष्मण मुरकुटे कॉलनी नं.१"-२ फलक

२. "कै.गजानन लक्ष्मण मुरकुटे कॉलनी नं.२"-२ फलक

३. "कै.गजानन लक्ष्मण मुरकुटे मार्ग- १

४. मुरकुटे कॉर्नर – १ फलक

५. कै.ह.भ.प. पांडुरंग आनंदराव गुळवे मार्ग- २ फलक सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

सही/-

(**सौ.नम्रता योगेश लोंढे** )

सभापती

क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क्र-कक्षेका/कावि/५१/२०१८.

दिनांक ८ /८/२०१८

सही/-

प्रशासन अधिकारी

तथा सचिव सभाशाखा

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत-सर्व संबंधित विभाग